जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 NOV 2024
पुण्यनगरी

# वेटलिफ्टिंगसाठी विद्यापीठ महिला संघ जाहीर

**कोल्हापूर :** आचार्य नागार्जुन विद्यापीठ, नागार्जुननगर येथे दि. २६ ते २८ नोव्हेंबरअखेर होणाऱ्या दक्षिण-पश्चिम आंतरविभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेकरिता शिवाजी विद्यापीठ महिला संघ रविवारी रवाना झाला. संघामध्ये विविध महाविद्यालयांतून १० महिला खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

**संघातील खेळाडू असे :** साक्षी सांडुगडे, सरिता सावंत (कोल्हापूर), निकिता कमलाकर (कुरुंदवाड), भूमिका मोहिते (अर्जुननगर), काजल सरगर (सांगली), राजनंदिनी आमने व राजलक्ष्मी पोवार, स्नेहा आमने (इचलकरंजी), प्राजक्ता साळुंखे, अपेक्षा ढोणे (सातारा).

संघ संघव्यवस्थापक म्हणून डॉ. रवींद्र चव्हाण (देवचंद कॉलेज, अर्जुननगर), तर प्रशिक्षक म्हणून डॉ. प्रशांत पाटील (शहाजी कॉलेज, कोल्हापूर) हे काम पाहणार आहेत. संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के., प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, डॉ. सुजय खोपडे यांचे प्रोत्साहन लाभले.

25 NOV 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ विभागीय जलतरण स्पर्धेत शाहू कॉलेजचे यश

**सकाळ वृत्तसेवा**


कोल्हापूर, ता. २४ : सागर पाटील जलतरण तलावावर झालेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय जलतरण स्पर्धेत शाहू कॉलेजच्या जलतरणपटूंनी यश मिळवले.

स्पर्धेत कॉलेजच्या तेजस मानेने १००, २०० मीटर बटरफ्लायमध्ये प्रथम, तर २०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये दुसरा, तर ५० मीटर बटरफ्लायमध्ये दुसरा क्रमांक मिळवला. ओमकार पाटील १५०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये पहिला, ८०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये दुसरा क्रमांक मिळवला. ऋषिकेश पाटीलने ४०० मीटर आय.एम. मध्ये दुसरा, १०० मीटर बॅक स्ट्रोकमध्ये दुसरा, १०० मीटर बेस स्ट्रोकमध्ये तिसरा, ५० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये तिसरा क्रमांक मिळवला.

मुलींमध्ये आंतरराष्ट्रीय जलतरणपटू सुबिया मुलाणी हिने वैयक्तिक अजिंक्यपद मिळवत ४६ गुण मिळवले. यात सुबियाने ४०० मीटर फ्रीस्टाईल, ५० मीटर फ्रीस्टाईलमध्ये पहिला, तर १०० मीटरमध्ये दुसरा, २०० मीटरमध्ये दुसरा, ८०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये पहिला, १५०० मीटरमध्ये पहिला, १०० मीटर बॅक स्ट्रोकमध्ये पहिला, २०० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये पहिला, ४०० मीटर आय.एम.मध्ये पहिला क्रमांक मिळवला. या तिन्ही जलतरणपटूंची २९ ते ३० नोव्हेंबर दरम्यान शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

जलतरणपटूंना मानसिंग पाटील, अंकुश पाटील, अमर पाटील, संतोष डोकरे, मोनिका कोरवी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या सरोज पाटील, महाविद्यालय विकास समितीच्या संगीता पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. डी. आर. भोसले, डॉ. गणेश लवगारे, डॉ. विक्रमसिंह नांगरे, प्रा. सविता माजगावकर यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 NOV 2024
तरूण भारत



# वेटलिफ्टींग स्पर्धेकरिता शिवाजी विद्यापीठ महिला संघ जाहीर

कोल्हापूर : आचार्य नागार्जुन विद्यापीठ नागार्जुन नगर येथे दिनांक २६ ते २८ नोव्हेंबर अखेर दक्षिण पश्चिम आंतर विभागीय वेटलिफ्टींग स्पर्धेकरिता शिवाजी विद्यापीठ महिला संघ जाहीर करण्यात आला आहे. या स्पर्धेकरिता शिवाजी विद्यापीठ महिला संघ आज रवाना झाला. संघामध्ये विविध महाविद्यालयातून १० महिला खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

संघातील खेळाडू पुढीप्रमाणे- साक्षी सांडुगडे, सरिता सावंत ,निकिता कमलाकर, भुमिका मोहिते, काजल सरगर, राजनंदिनी आमने, राजलक्ष्मी पोवार, नेहा आमने , प्राजक्ता साळुंखे ,अपेक्षा ढोणे यांचा समावेश आहे. संघाचे संघव्यवस्थापक म्हणून डॉ. रवींद्र चव्हाण – देवचंद कॉलेज अर्जुननगर तर प्रशिक्षक म्हणून डॉ.प्रशांत पाटील– शहाजी कॉलेज कोल्हापूर हे काम पाहणार आहेत. संघाला कुलगुरू डॉ. डि. टि.शिर्के,प्र कुलगुरू डॉ. पी.एस.पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.शरद बनसोडे,डॉ. सुचय खोपडे यांचे प्रोत्साहन लाभले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 NOV 2024
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तर परीक्षा उद्यापासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील विधानसभा निवडणुकीमुळे पुढे ढकललेल्या पदवी व पदव्युतरच्या परीक्षा उद्या (दि. २६) पासून होत आहेत.

कोल्हापूर, सांगली, . सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयातून १ लाख ८५ हजार १९३ विद्यार्थी देणार आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २९० महाविद्यालयातील बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., एम. कॉम., एमएस्सी यासह अन्य व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या ८५० विषयांच्या परीक्षा उद्यापासून होत आहेत. याच्या प्रश्नपत्रिका विद्यापीठाने तयार केलेल्या एसआरपीडीच्या माध्यमातून पहिल्यांदाच पाठवण्यात येणार आहे. हा प्रयोग यशस्वी करण्याचा विद्यापीठाचा मानस असल्याने तांत्रिक गोष्टींवर विशेष लक्ष देण्यासाठी विद्यापीठातील अनेक तज्ज्ञांची नियुक्ती केली आहे. तसेच उत्तरपत्रिकेसह अन्य साहित्य पाठवले आहे. परीक्षेत गैरप्रकार घडू नये म्हणून बैठ्या व फिरत्या भरारी पथकांची नियुक्ती केली आहे.